महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२३/प्र.क्र.४७१/२०२३/जाहिरात दिनांक:- २४ मे, २०२४

## -: शुद्धिपत्रक :-

## सहायक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी, गट-अ (जाहिरात क्रमांक १३२/२०२३)

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागातील इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे अंतर्गत **सहायक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी, गट-अ** या संवर्गातील एकुण २६ पदांच्या भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याला सुरवात झालेली नव्हती. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/ प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अनुसार विषयांकित संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातीकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने शासन पत्र, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: आस्थाप्र-२०२२/प्र.क्र.२५/आस्थापना-२, दिनांक १४ मे, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गाकरीता पदे आरक्षित दर्शवून सुधारित मागणीपत्र पाठविले आहे. त्यानुसार पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे राहील:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.व शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०३ | ०२ | ०५ | १९ | ०७ | २६ |
| सर्वसाधारण | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०२ | ०१ | ०३ | १३ | ०५ | १८ |
| महिला | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ | ०६ | ०२ | ०८ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | - |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | एकूण २६ पदांपैकी - ०१ पद दिव्यांग कर्णबधीरता / ऐकू येण्यातील दुर्बलता करीता आरक्षित | | | | | | | | | | | | |

**२.** शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सदर मूळ जाहिरातीस अनुसरून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

**३.** आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या **सहायक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी, गट-अ (जाहिरात क्रमांक १३२/२०२३)** करीता अर्जाद्वारे फक्त अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच अराखीव (खुला) मधील उमेदवार जे मूळ जाहिरातीकरीता **वयाधिक ठरल्याने** अर्ज सादर करू शकले नाहीत, अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील उमेदवारांकरीता नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र १३२/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या "Question " या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करण्यासाठी विहित पद्धतीने तसेच विहित कालावधीत विकल्प सादर न करणाऱ्या उमेदवारांचा प्रस्तुत परीक्षेकरीता यापूर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरतीप्रकियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणामुळे मागासवर्गीयांकरीता अनुज्ञेय असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीस अनुसरून नव्याने पात्र ठरणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र १३२/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

(५) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवाराने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही

खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक २७ मे, २०२४ रोजी १४.०० ते<br>दिनांक १० जून, २०२४ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक १० जून, २०२४ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक १२ जून, २०२४ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १३ जून, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

४. **सहायक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी, गट-अ (जाहिरात क्रमांक १३२/२०२३)** या संवर्गाच्या **मूळ जाहिरातीनुसार** कमाल वयोमर्यादा गणण्याचा **दिनांक ०१ एप्रिल, २०२४** असा राहील. तसेच **शैक्षणिक अर्हता गणण्याचा दिनांक मूळ जाहिरातीनुसार** अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच **दिनांक ०१ जानेवारी, २०२४** असा राहील.

५. **सहायक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी, गट-अ (जाहिरात क्रमांक १३२/२०२३)** करीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर विकल्प सादर करण्यासाठी विहित अंतिम दिनांकापूर्वीचे म्हणजेच **दिनांक १० जून, २०२४ पूर्वीचे** असणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत संवर्गाकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील. सहायक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी, गट-अ (जाहिरात क्रमांक १३२/२०२३)** च्या मूळ जाहिरातीस व सदर शुद्धिपत्रकास, आयोगाच्या दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदी लागू राहतील.

८. दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध मूळ जाहिरात तसेच दिनांक २४ मे, २०२४ रोजी प्रसिद्ध प्रस्तुत शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, (जाहिरात)
ठिकाण: नवी मुंबई
महाराष्ट्र लोकसेवा आयोग